महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/COVID-१९-११/ ११४७६
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : **१७.०६.२०२०**

# परिपत्रक

**विषय :** बंद (Lock Down) कालावधीमध्ये दिव्यांग अधिकारी/ कर्मचारी यांच्या कार्यालयातील उपस्थितीबाबत स्पष्टीकरणात्मक सूचना

**संदर्भ :** १) परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र.९/COVID-१९-६/९३०४ दि. ०३.०५.२०२०.
२) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १०२०२/प्र.क्र. ०१/ सचिव (व्यय) दि. ०५.०६.२०२०.
३) परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र.९/COVID-१९-१०/१११५१ दि. ०७.०६.२०२०.
४) शासन निर्णय क्र. समय २०२०/प्र.क्र.३५/१८ (रवका) दि. ११.०६.२०२०.

कोविड - १९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाकडून तसेच कंपनीकडून कार्यालयीन उपस्थिती मर्यादित ठेवण्याबाबत वेळोवळी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. संदर्भ क्र. १ मधील परिपत्रकान्वये शासन निर्णय क्र. समय/२०२०/प्र.क्र.३४/१८ (रवका) दि. २१.०४.२०२० मधील सूचनांच्या धर्तीवर कंपनीतील सर्व दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट देण्यात आलेली आहे. तसेच संदर्भ क्र. ३ मधील परिपत्रकान्वये शासनाच्या धर्तीवर नियंत्रीत / प्रतिबंधीत (Containment Zone) केलेले क्षेत्र वगळता M.M.R. क्षेत्रातील बृहन्मुंबई महानगरपालिकेसह सर्व महानगरपालिका, तसेच पुणे, सोलापूर, औरंगाबाद, मालेगाव, नाशिक, धुळे, जळगाव, अकोला, अमरावती आणि नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील कंपनीच्या प्रशासकीय कार्यालयांमध्ये दि. ०३.०६.२०२० पासून कर्मचाऱ्यांनी रोटेशन पध्दतीने उपस्थित राहण्याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. सद्यस्थितीत संदर्भ क्र. ४ मधील शासन निर्णयान्वये दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांच्या कार्यालयातील उपस्थितीबाबत स्पष्टीकरणात्मक सूचना पारीत करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कंपनीतील दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबत खालील मार्गदर्शक सूचना प्रसारीत करण्यात येत आहेत.

अ) नियंत्रीत / प्रतिबंधीत (Containment Zone) केलेले क्षेत्र वगळता **M.M.R. क्षेत्रातील बृहन्मुंबई महानगरपालिकेसह सर्व महानगरपालिका, तसेच पुणे, सोलापूर, औरंगाबाद, मालेगाव, नाशिक, धुळे, जळगाव, अकोला, अमरावती आणि नागपूर महानगरपालिका** क्षेत्रामधील कंपनीच्या प्रशासकीय कार्यालयांमध्ये सर्व कर्मचारी / अधिकारी यांच्या उपस्थितीबाबतचे रोस्टर तयार करून रोटेशन पध्दतीने कामकाज पूर्ण करावयाचे आहे. उर्वरीत कर्मचाऱ्यांनी घरी राहून दूरध्वनीव्दारे संपर्कात राहून कंपनीच्या कामकाजात मदत करावयाची आहे. **अशाप्रकारे उपस्थिती नियंत्रित करण्यात आलेल्या कार्यालयामधील दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट अनुज्ञेय असेल.**

ब) वरील क्षेत्र वगळता इतर क्षेत्रामधील कंपनीच्या कार्यालयांमध्ये दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांची उपस्थिती अनिवार्य राहील.

क) ज्या दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट मिळालेली आहे, त्यांनी कार्यालयातील त्यांचेकडील महत्वाच्या व तातडीच्या कामकाजाचा निपटारा होण्याच्या दृष्टीकोनातून त्यांचे मोबाईल क्रमांक तसेच ई-मेल आयडी कार्यालयास उपलब्ध करून द्यावेत व दिलेल्या मोबाईल क्रमांकावर उपलब्ध रहावे.

३. सदरच्या सूचना पुढील आदेशांपर्यंत लागू राहतील. यापूर्वी कोवीड - १९ च्या व्यवस्थापनाबाबत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकारेपणे पालन करावे.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोवत :** दि. ११.०६.२०२० रोजीचा शासन निर्णय.

**(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

Scanned with CamScanner

**महाराष्ट्र राज्यातील कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये दिव्यांग अधिकारी/ कर्मचारी यांच्या शासकीय कार्यालयातील उपस्थितीबाबत स्पष्टीकरणात्मक सूचना.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
**शासन निर्णय क्रमांक : समय २०२०/प्र.क्र.३५/१८(र.वका.)**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०००३२
दिनांक : ११ जून, २०२०

वाचा:- :

१. केंद्रशासनाच्या लोकतक्रार, पेन्शन, कार्मिक व प्रशिक्षण मंत्रालयाचे क्र.११०१३/९/२०१४-Estt-(A III) दिनांक २२ मार्च, २०२० चे आदेश.
२. केंद्रशासनाच्या लोकतक्रार, पेन्शन, कार्मिक व प्रशिक्षण मंत्रालयाचे क्र.११०१३/९/२०१४-Estt-(A III) दिनांक २७ मार्च, २०२० चे आदेश.
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-२०२० / प्र. क्र. ३५ /१८ (र.वका.), दिनांक १८ एप्रिल, २०२०
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-२०२० / प्र. क्र. ३५ /१८ (र.वका.), दिनांक २१ एप्रिल, २०२०
५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-२०२० / प्र. क्र. ३५ /१८ (र.वका.), दिनांक ४ मे, २०२०
६. केंद्रशासनाच्या लोकतक्रार, पेन्शन, कार्मिक व प्रशिक्षण मंत्रालयाचे क्र.११०१३/९/२०१४-Estt-(A III) दिनांक १९ मे, २०२० चे आदेश.
७. उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना यांचे मा.मुख्य सचिव महोदयांना उद्देशून लिहिलेले पत्र क्र. १८५१/२०२० दि. २७ मे, २०२०.
८. शासन आदेश, आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनवर्सन, क्रमांक :डीएमयू २०२०/सीआर ९२/डीआयएसएम-१, दिनांक ३१ मे, २०२०.

**शासन निर्णय:-**

या विभागाच्या उक्त संदर्भ क्र. ४ येथील दि. २१ एप्रिल, २०२० च्या शासन निर्णयान्वये उक्त संदर्भ क्र. २ येथील केंद्र शासनाच्या दिनांक २७ मार्च, २०२० रोजीच्या आदेशातील तरतूदीनुसार राज्यामध्ये लॉकडाऊनच्या कालावधीत शासकीय कार्यालयामध्ये

दिव्यांग अधिकारी / कर्मचाऱ्यांना कामकाज करण्यासाठी उपस्थित राहण्यापासून सूट देण्यात आलेली आहे. मदत व पुनर्वसन विभागाच्या उक्त संदर्भ क्र. ८ येथील दि. ३१ मे, २०२० च्या आदेशान्वये कोरोना विषाणूंचा प्रभाव अधिक असलेल्या क्षेत्रातील शासकीय कार्यालयांमध्ये रोटेशन पध्दतीने दैनंदिन उपस्थिती १५ टक्के इतकी ठेवण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. अशाप्रकारे ज्या क्षेत्रातील शासकीय कार्यालयामधील उपस्थिती रोटेशनने नियंत्रित करण्यात आलेली आहे, अशी क्षेत्रे वगळता उर्वरित क्षेत्रांमधील शासकीय कार्यालयामध्ये दिव्यांग अधिकारी/ कर्मचाऱ्यांना कामकाज करण्यासाठी उपस्थित राहण्यापासून सूट आहे किंवा कसे याबाबत सुस्पष्ट आदेश देण्याची विनंती उक्त संदर्भ क्र. ७ येथील उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना यांच्या पत्रान्वये करण्यात आलेली आहे.

२. उक्त विनंतीस अनूसरुन खालीलप्रमाणे स्पष्टीकरणात्मक सूचना देण्यात येत आहेत:-

(i) कोवीड-१९ विषाणूंच्या (COVID-१९) प्रसारावर प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने शासकीय कार्यालयांमधील कर्मचाऱ्यांची एकूण उपस्थिती नियंत्रित करण्याबाबत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. या शासन निर्णयानुसार लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये निश्चित केलेल्या कर्मचारीवर्गाच्या प्रमाणामध्ये (%) संबंधित विभागप्रमुख/कार्यालयप्रमुखांनी त्यांच्या कार्यालयांतील अत्यावश्यक व तातडीच्या स्वरुपाचे कामकाज करण्यासाठी कर्मचाऱ्यांची रोटेशनने यादी (रोस्टर) तयार करावयाची असून त्यानुसार संबंधित कर्मचाऱ्यांनी कार्यालयात येऊन महत्वाचे कामकाज पूर्ण करावयाचे आहे. उर्वरित घरी राहणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दूरध्वनीद्वारे संपर्कात राहून शासकीय कामकाजात मदत करावयाची आहे. अशा पध्दतीने रोटेशनने ज्या कार्यालयातील उपस्थिती नियंत्रित करण्यात आली आहे, अशा कार्यालयामधील दिव्यांग अधिकारी/ कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट अनुज्ञेय असेल.

(ii) ज्या क्षेत्रातील शासकीय कार्यालयामध्ये शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती रोटेशनने नियंत्रित करण्यात आलेली नाही, अशा कार्यालयांमध्ये दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांची उपस्थिती अनिवार्य राहील.

(iii) ज्या दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट मिळालेली आहे, त्यांनी कार्यालयातील त्यांचेकडील महत्वाच्या व तातडीच्या शासकीय कामकाजाचा निपटारा होण्याच्या दृष्टीने त्यांचे मोबाईल क्रमांक तसेच ई-मेल आयडी कार्यालयास उपलब्ध करुन दयावेत व दिलेल्या मोबाईल क्रमांकावर उपलब्ध रहावे.

३. सदरचे आदेश पुढील आदेशापर्यन्त लागू राहतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२००६१११०१२१७६३०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Rajesh Bhaskar Gaikwad

Digitally signed by Rajesh Bhaskar Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5b1378a498cdff3fdd9ea5370b71fae3eca97e85924d0e443758ade5f0221f9a, serialNumber=26e171ec96c63f6333217d12fb6da1c5a800ce18a7a6fd59abf19b8ed3f02a91, cn=Rajesh Bhaskar Gaikwad
Date: 2020.06.11 11:00:09 +05'30'

**( रा. भा. गायकवाड )**
**कार्यासन अधिकारी**

**प्रत :**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव (५ प्रती),
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
६. मा. मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव(५ प्रती), मंत्रालय, मुंबई ४०००३२.
७. मा.उपमुख्य मंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.

८. सर्व मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
९. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१०. मा.महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य,
११. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१२. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
१३. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई
१४. प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय,
१५. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१७. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१८. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
१९. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई,
२०. सर्व विभागीय आयुक्त,
२१. आयुक्त, सर्व महानगर पालिका,
२२. व्यवस्थापकीय संचालक, BEST महामंडळ, मुंबई
२३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मुंबई
२४. सर्व जिल्हाधिकारी,
२५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२६. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख / प्रादेशिक प्रमुख/ कार्यालय प्रमुख,
२७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती),
२८. अध्यक्ष/सचिव, महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना, मुंबई - ३२.
२९. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२०.
३०. इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस(आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०००२५.
३१. नॅशनलीस्ट कॉंग्रेस पार्टी, ठाकरसी हाऊस, जे.एन.हेरेडीया मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०००३८.
३२. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०००२८.
३३. बहुजन समाज पार्टी, प्रदेश सचिव, महाराष्ट्र राज्य, बी.एस.जी.भवन, प्लॉट नं. ८३-अे, कलेक्टर कॉलनी, चेंबूर, मुंबई-४०००१४.
३४. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई ४००००४.

३५. भारतीय कम्युनिस्ट(मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई ४०००१३.
३६. महाराष्ट्र नवनिर्माण सेवा, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई ४०००२८.
३७. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई ४०००३२
३८. निवड नस्ती (का.१८), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.